दै. लोकमत दि. 18/04/25

मस्ट READ

# फेसबुक, इन्स्टा जपून वापरा; पोस्टवर पोलिसांच्या आहेत नजरा

## सोशल मीडियाचा वापर करताना घ्या काळजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** फेसबुक, इन्स्टा, व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पाठविलेल्या प्रत्येक मेसेजवर सायबर क्राईमची विशेष नजर असते. सोशल कनेक्टिव्हिटी, व्यावसायिक व मनोरंजनाचे साधन म्हणून व्हॉट्सॲपचा वापर केला जात असला तरी त्याचे जेवढे फायदे तेवढेच तोटेही आहेत. त्यामुळे फेसबुक, इन्स्टा, व्हॉट्सॲप वापरताय, तोल सावरा, अन्यथा गुन्हा दाखल होऊ शकतो, असा सल्ला सायबर पोलिसांनी दिला आहे.

वाढत्या लोकांचे सायबर गुन्हे विशेषकरून हॅकिंग, प्रताधिकारभंग, बाललैंगिक चित्रण इत्यादी स्वरूपात घडताना दिसतात. खासगी किंवा गोपनीय माहिती चोरणे, फोडणे आदी प्रकार देखील सायबर गुन्ह्यांमध्ये मोडतात. इंटरनेटच्या वापरांमुळे आयुष्य तर अधिक सहज सोपे झाले आहे. सोबतच यामुळे अनेक अडचणी देखील वाढल्या आहेत. नागरिकांना सायबर क्राईमची माहिती नसते.

### काय होते कारवाई?

फेसबुक, इन्स्टा, व्हॉट्सॲपवरून आक्षेपार्ह मेसेज, ऑडिओ, व्हिडीओ अपलोड, शेअर वा फॉरवर्ड केल्यास आयटी ॲक्टसह आयपीसीच्या कलमांन्वये गुन्हा दाखल केला जातो.



### सायबर पोलिसांची विशेष नजर

इंटरनेटच्या वापरांमुळे आयुष्य तर अधिक सहज सोपे झाले मात्र यामुळे अनेक अडचणी वाढल्या आहेत. सोशल मीडिया वापरकर्त्यांवर सायबर पोलिसांची सूक्ष्म नजर आहे. कुणी धार्मिक तेढ, प्रक्षोभक वक्तव्य करीत आहे का, कुणी ते शेअर किंवा फॉरवर्ड करीत आहे का, कुणी चोरून लपून चाईल्ड पॉर्न तर पाहत नाही ना, यावर सायबर पोलिसांचे २४ बाय ७ लक्ष आहे.

### धार्मिक तेढ, प्रक्षोभक वक्तव्य पडेल महागात

व्हॉट्सॲप वा कुठल्याही समाजमाध्यमांवरून धार्मिक तेढ, प्रक्षोभक वक्तव्य करीत असाल, तर सावधान ते महागात पडू शकते. सायबर पोलिस किंवा संबंधित पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी तुमच्याविरुद्ध गुन्हा दाखल करू शकतात. शिक्षण घेणाऱ्या युवक-युवतींनी पोस्ट करण्याच्या नादात पडू नये.

### तीन महिन्यांत अनेक गुन्हे

नांदेड जिल्ह्यात तीन महिन्यात अनेक दाखल झाले. सोशल मीडियावर सक्रिय राहणारे लोक हुशार असतात. तसेच काही लोक विनाकारण तेढ निर्माण होईल अशी पोस्ट करतात.

### या गोष्टी टाळा

कुठलाही मेसेज कॉपी पोस्ट करणे टाळा. खात्री केल्याशिवाय फॉरवर्ड करू नका.

तेढ निर्माण करणारे मेसेज टाळावेत किंवा व्हॉट्सॲपवर उपलब्ध आहे. मेसेज शेअर किंवा लाइक करताना पडताळून पहावे.




### ग्रुप ॲडमिन आहात, ही पथ्ये पाळा

देशविरोधी कन्टेन्ट शेअर करू नका, अश्लील कन्टेन्ट शेअर करू नका, वैयक्तिक व्हिडीओ, फोटो शेअर करू नका, हिंसा भडकावणाऱ्या पोस्ट शेअर करू नका. ग्रुपची नियमावली करा. ग्रुपमधील सदस्यांना आपल्या नियमावलीचे स्मरण नियमित राहील याची आठवण करुन द्या.